दिवाणी दावा क्रमांक ८१८/२००८ अंतर्गत न्यायालयाच्या आदेशानुसार श्रीमती विणा दिनानाथ काळे यांना रु.१,९०,८५७/- अदा करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन ज्ञापन क्रमांक: एससीवाय-२०१८/सं.क्र.०८/म-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १५ मे, २०१८

<u>वाचा</u> : शासन निर्णय क्र.एआयएस-१२०५/प्र.क्र.३१०/११अे, दि.७ जुलै, २००६

<u>प्रस्तावना :</u>

शेतकरी जनता अपघात विमा योजना सन २००६-०७ या वर्षासाठी राबविण्याचा निर्णय कृषी विभागाने घेतला होता. सदर योजनेची अंमलबजावणी महसूल यंत्रणेमार्फत करण्यात आली होती. मृतक दिनानाथ मिलाजी काळे, राहणार रिधोरा, तालुका काटोल, जिल्हा नागपूर हे मौजा रिधोरा येथील शेतकरी असून त्यांचा दिनांक २५/०३/२००७ रोजी मोटार सायकल अपघातात मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या पत्नी श्रीमती वीणा दिनानाथ काळे यांनी दिनांक ०५/०५/२००७ रोजी कोतवालामार्फत तहसिलदार, काटोल, जि.नागपूर यांचेकडे शेतकरी विमा योजनेच्या नुकसान भरपाईची रक्कम मिळणेसाठी अर्ज केला होता. सदर अर्ज तहसिलदार काटोल यांनी दिनांक ३१/०८/२००८ रोजी विमा कंपनीकडे पाठविला. अपघात विमा योजना समाप्तीच्या दिनांकापासून ९० दिवसांपर्यन्त दावे स्विकारण्याचे बंधन विमा कंपनीवर होते. परंतु सदर दावा विहीत मुदतीत सादर न केल्यामुळे विमा कंपनीने फेटाळला. तहसिलदार, काटोल यांनी विम्याचा दावा पाठविण्यासाठी टाळाटाळ केली. त्यामुळे श्रीमती विणा दिनानाथ काळे यांनी दिवाणी दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल दिनांक ०३/०८/२०१६ रोजी न्यायालयाने दिला असून वादीस रु.१ लक्ष व ९% दराने व्याजासहीत एकूण रु.१,९०,८५७/- रक्कम शासनाने अदा करण्याबाबतचे आदेश दिले आहेत. शेतकरी जनता अपघात विमा योजनेची अंमलबजावणी महसूल यंत्रणेमार्फत करण्यात आली असल्याने श्रीमती वीणा दिनानाथ काळे यांना रु.१,९०,८५७/- इतकी रक्कम अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>ज्ञापन :</u>

मा.सहदिवाणी न्यायालय, नागपूर यांनी दिलेल्या दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या आदेशानुसार मृतक श्री.दिनानाथ काळे यांच्या विधवा पत्नी श्रीमती विणा दिनानाथ काळे यांना नुकसान भरपाईची रक्कम रु.१.०० लाख तसेच ९ टक्के दराने आकारलेले व्याज रु.९०,८५७/- अशी एकूण रु.१,९०,८५७/- इतकी रक्कम अदा करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. या प्रयोजनासाठी होणारा खर्च महसूल व वन विभाग (खुद्द), मंत्रालय यासाठी असलेल्या कार्यालयीन खर्चाकरीता मागणी क्र.सी - ४, मुख्य लेखाशीर्ष २०५२ ०२१२- १३ -कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षांतर्गत उपलब्ध तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदर रक्कम आहरित करण्यासाठी जिल्हाधिकारी, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांनी श्रीमती काळे यांना रु.१,९०,८५७/-एवढी रक्कम अदा करुन उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

३. सदरचा शासन निर्णय हा वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. १७७/१८/व्यय-९, दिनांक १३.०४.२०१८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०५१५१३१०३५४४१९ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vijay Marotrao Nandekar

Digitally signed by Vijay Marotrao Nandekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=77eb3263d1e0e790641287f679612e3f1a8f57c79815a39be6e16e1ca50c9976, cn=Vijay Marotrao Nandekar
Date: 2018.05.15 13:09:57 +05'30'

(वि.मा.नांदेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. विभागीय आयुक्त, नागपूर
२. जिल्हाधिकारी, नागपूर
३. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
४. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
५. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर,
६. संचालक, लेखा व कोषागारे, मंत्रालय, मुंबई,
७. सहसचिव (अर्थसंकल्प), महसुल व वन विभाग, (सदर रक्कम BEAMS प्रणालीवर वितरित करण्याच्या विनंतीसह.)
८. श्रीमती वीणा दिनानाथ काळे, मु.पो.रिधोरा,ता.काटोल, जि.नागपूर
९. वित्त विभाग, (कार्यासन/व्यय ९), मंत्रालय, मुंबई
१०. कक्ष अधिकारी (ब-१) , महसुल व वन विभाग,
११. उप सचिव (गृह व्यवस्थापन)
१२. निवडनस्ती कार्यासन म-७, महसुल व वन विभाग.